**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र. : ०२२-२२७९३८३७ Email ID : sachin.ds@nic.in

---

क्रमांक :कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक : २१ डिसेंबर, २०२०

**प्रति,**

**१) सर्व विभागीय आयुक्त,**
**२) सर्व महानगरपालिका आयुक्त,**
**३) सर्व जिल्हाधिकारी,**
**४) सर्व मुख्याधिकारी/ नगरपरिषद/ नगरपंचायत.**

**विषय:- महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या स्थायी समिती व वैधानिक समित्यांच्या बैठकांबाबत.**

**संदर्भ-** १. शासनाचे समक्रमांकाचे दि.०९.०९.२०२० चे पत्र.
२. शासनाचे समक्रमांकित दि.०३.०७.२०२० चे पत्र.
३. शासनाचे समक्रमांकित दि.०३.०४.२०२० चे पत्र.
४. शासनाचे समक्रमांकित दि.२७.०३.२०२० चे पत्र.
५. साथरोग प्रतिबंधात्मक नियम १८९७ व त्या अंतर्गत सक्षम प्रधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना/ आदेश.

**महोदय,**

सर्व नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्या विहीत बंधनकारक सभा/ बैठका ह्या पुढील आदेशापर्यंत नियमितपणे केवळ व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारेच घेण्याबाबत संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये सूचित करण्यात आले होते.

२. आता, नागरी स्थानिक संस्थांच्या स्थायी समिती व वैधानिक समित्यांच्या बैठकांबाबत/ सभांबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

(अ) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या स्थायी समिती व वैधानिक समित्यांच्या बैठका आरोग्य विषयक निकष, कोवीड-१९ संदर्भातील विहीत कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने / उपस्थितीने घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ब) सदर बैठकांमध्ये मास्कचा वापर, योग्य शारिरीक अंतर ठेवणे, हातांची स्वच्छता, सर्दी व खोकताना घ्यावयाची काळजी, बैठकीसाठी पुरेशी शक्यतो मोकळी हवेशीर जागा, सॅनिटायझरचा वापर यानुसार सुरक्षित अंतरावर बैठक व्यवस्था करुन सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे तंतोतंत करण्यात यावे.

३. आरोग्य विषयक निकष, कोवीड-१९ संदर्भातील विहीत कार्यपध्दती याची परिपूर्ण सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित पिठासिन अधिकारी व महानगरपालिका आयुक्त / मुख्याधिकारी यांची असेल.

**आपला,**

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**अवर सचिव**

**प्रत**:-निवडनस्ती (नवि-१४)